**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.**

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक १८.०७.२०१७ रोजी सकाळी ११.३० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. ए. पी. विधळे | मा.सहसचिव (कामगार) |
| ५. | श्री. रत्नाकर जवळगेकर | मा. संचालक व लेखा कोषागारे यांचे प्रतिनिधी |
| ६. | श्री. सतीश मगर | मा. मालक प्रतिनिधी |
| ७. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |

४२ वी बैठक दिनांक १८.०७.२०१७

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदयांचे व सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आला.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीचे इतिवृतांत

| अ.क्र. | विषय | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.** | मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले व बैठकीच्या ठरावावरील कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मंडळास अवगत केला. सदर इतिवृत्तांतास मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेनंतर दिनांक १६.०६.२०१७ रोजी इतिवृत्त सर्व सदस्यांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आले असल्याचे स्पष्ट केले. सदर इतिवृत्तात काही बदल करावयाचे असल्यास त्यासह इतिवृत्त कायम करणे प्रस्तावित आहे, असे मंडळ सचिव म्हणाले.<br>त्यानुसार, काहीही बदल न करता मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>१(१) ठराव: मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मंडळ सचिव यांनी सविस्तर अहवाल सादर केला. त्याची सर्व उपस्थित सदस्यांनी नोंद घेतली.<br>दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत झालेल्या ठरावांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वेगवेगळया विषयांवर चर्चा करण्यात आली.<br>कामगार प्रतिनिधी श्री कुटास्कर यांनी शासनाला पाठविलेल्या प्रस्तावावर काय कार्यवाही करण्यात आली याचा इतिवृत्तांतात समावेश करण्यात यावा असे सुचित केले असता मंडळ सचिव यांनी, मंडळ स्तरावरुन शासनास सादर केलेले प्रस्ताव व मंडळ स्तरावर केलली कार्यवाही याबाबत मंडळास अवगत करणे शक्य आहे. तथापि, शासन स्तरावरुन करण्यात आलेली कार्यवाहीबाबत अवगत करणे शक्य नाही, असे नमूद केले.<br>मा. अध्यक्ष यांनी जनजागृती सप्ताहाबद्दल विचारणा केली असता मा. सहसचिव श्री. विधळे यांनी सदर फाईल आपल्या स्तरावरुन मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या कार्यालयास सादर करण्यात आली असल्याचे सांगितले.<br>मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी अवजारे हत्यारे खरेदी करणेबाबत वाटप स्थितीची विचारणा केली असता दिनांक १२.०७.२०१७ पर्यंत सुमारे १.६२ कोटी रक्कमेचे वाटप झाल्याचे मंडळ सचिव म्हणाले. त्यावर सदर योजनेचे वाटप खुपच कमी झाल्याचे मा. अध्यक्ष म्हणाले व योजनेच्या मागणीसाठी किती अर्ज मंडळाकडे प्राप्त |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | झाले, त्याचा आढावा घेण्यात यावा, अशी सुचना दिली. यावर मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी एखाद्या संघटनेने जर अनेक कामगारांचे अर्ज कार्यालयात जमा केले तर, सदर अर्जाच्या आधारे, अर्जदार नोंदित बांधकाम कामगारास त्या योजनेचा लाभ देण्यात यावा, त्यामुळे जास्तीत जास्त कामगारांना योजनांचा लाभ मिळू शकेल, असे सुचित केले. त्यास श्री. मगर यांनी दुजोरा दिला. त्यावर मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, चुकीच्या पद्धतीने वाटप होवू नये यासाठी अर्जदाराने लाभाच्या वाटपासाठी स्वत: उपस्थित राहून अर्ज करणे आवश्यक आहे. कामगार आयुक्त असे म्हणाले की, कामगारांकडून दलाल पैसे घेऊन अर्ज कार्यालयात जमा करतात त्यामुळे कामगारांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामूळे नोंदणी तसेच लाभ वाटपापूर्वी पडताळणीसाठी कामगाराने प्रत्यक्षात उपस्थित रहाणे योग्य वाटते, असे मत व्यक्त केले. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी मंडळाकडे जिवित नोंदित बांधकाम कामगारांचा तपशिल उपलब्ध असल्याने अशा कामगारांकडून योजनांच्या अर्जाची मागणी न करताच त्यांच्या बँक खात्यावर लाभाची रक्कम DBT पद्धतीने जमा करावी व त्याबाबत त्यांना SMS System द्वारे कळविण्यात यावे, असे मत व्यक्त केले. त्यास मा. सहसचिव श्री. विधळे यांनी सहमती दर्शवून बल्क एसएमएस पाठविण्यासाठी एजन्सीची निवड करण्याचे सुचविले. याबाबत मा. संचालक लेखा व कोषागारे यांचे उपस्थित प्रतिनिधी यांनी लाभाच्या वाटपासाठी अर्ज घेणे आवश्यक आहे, असे स्पष्ट केले. चर्चेअंती मा. कामगार आयुक्त यांनी असे नमूद केले की, मा. सर्वोच्च |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | न्यायालयाच्या दि. १८.०१.२०१० रोजीच्या निर्णयानुसार कामगारांची नोंदणी तसेच कामगारांना लाभ मिळण्यासाठीचे अर्ज दाखल करण्यासाठी कामगार संघटनांची मदत/ सहाय्य घेण्यात यावे, असे निर्देश आहेत. या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळण्याकरीता अर्ज सादर करण्यासाठी कामगार संघटनांचे सहाय्य घेणेबाबत मंडळाने ठराव घेऊन शासनाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास शासनमान्यता अपेक्षित आहे. सांगली जिल्हयातील गत अनुभव लक्षात घेता, यामध्ये असामाजिक तत्व गैरफायदा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदर प्रकरणी कामगार संघटनांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर पूर्व नियोजित वेळेत कामगारांस समक्ष बोलवून अर्जातील मजकुराच्या पडताळणीअंती मंजूर केलेल्या लाभाची रक्कम नोंदित बांधकाम कामगारांच्या खात्यात DBT पद्धतीने पैसे जमा करण्यात यावी. योजनेचा लाभ जास्तीत जास्त कामगारांना मिळावा यासाठी तसेच मंजूर करण्यात आलेल्या लाभाबाबत संबंधित नोंदित बांधकाम कामगारांना SMS द्वारे कळविण्यात यावे. तसेच कामगारांना योजनेची माहिती व्हावी यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी. त्यावर कुटास्कर यांनी जाहिरातीवर बंदी असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यावर मंडळ सचिव यांनी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत प्रसिद्धी देता येईल असे स्पष्ट केले.<br>याबाबत सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **१(२) ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता द्यावयाच्या रु.५०००/- अनुदानाचा लाभ जास्तीत जास्त कामगारांना मिळावा यासाठी शासनमान्यतेनुसार कामगार संघटनांकडून नोंदित बांधकाम कामगारांचे अर्ज तयार करुन सादर करण्यासाठी सहाय्य घेण्यात यावे छाननीमध्ये सदरचे अर्ज परिपूर्ण असल्यास कामगारांच्या पडताळणीअंती पात्र नोंदित बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ DBT व्दारे देण्यात यावा. ज्या बांधकाम कामगारांचे मोबाईल नंबर मंडळाकडे उपलब्ध आहेत त्यांना SMS द्वारे योजनेचा लाभ घेणेबाबत कळवावे व सदर कामासाठी स्वतंत्र संस्था निश्चित करावी. याशिवाय जिल्हा स्तरावर माहिती व जनसंपर्क विभागामार्फत सदर योजनेस प्रसिद्धी देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २. | **मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने देता यावा यासाठी सुधारित एकात्मिक संगणकीय** | याबाबत बोलताना मंडळ सचिव मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ च्या बैठकीतील ठरावानुसार मे. KPMG यांची नियुक्ती दिनांक २३.०३.२०१७ रोजी करण्यात आली व त्यांना एकात्मिक संगणकीय प्रणालीची RFP Document तयार करण्याबाबत कळविण्यात आले. सदर प्रारूप RFP Document बाबत मा.प्रधान सचिव कामगार विभाग, मा. कामगार आयुक्त व मा. विकास आयुक्त, असंघटीत कामगार यांच्या दि. ०२.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत प्रारूप RFP Document मध्ये खालील बदल करावयाचे ठरले. प्रस्तावित बदलास मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली. |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **प्रणालीच्या RFP Document ला मंजूरी देणेबाबत.** | १. कामगार विभागांतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ वेगवेगळे असले तरी दोन्ही मंडळामार्फत असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणे अभिप्रेत आहे. त्यामुळे एकाच विभागांतर्गत दोन मंडळाकरीता वेगवेगळे कार्यालय न ठेवता कामगारांच्या सोयीकरीता एकच कार्यालय (WFC) असावे.<br>२. कामागरांकरीता सुविधा केंद्र स्थापन करणे व सदर सुविधा केंद्रामध्ये संगणकीय प्रणाली विकसीत करून त्यासंबंधीचे हार्डवेअर व नेटवर्कींग करणे व त्याचे मेंटेनन्स करणे ही दोन वेगवेगळी कामे असून सदर दोन्ही कामांसाठी स्वतंत्र कौशल्यांची (Skill set) गरज आहे. त्यामुळे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात यापूर्वी तयार करण्यात आलेल्या RFP Document मध्ये बदल करून कामगार सुविधा केंद्र स्थापनेसाठी स्वतंत्र RFP Document तयार करावे व संगणकीय प्रणाली विकसीत करून त्यासंबंधीचे हार्डवेअर व नेटवर्कींग करणे व त्याचे मेंटेनन्स करणे यासाठी स्वतंत्र RFP Document तयार करावे, जेणेकरून सदर प्रकियेमध्ये जास्त वेळ खर्ची होणार नाही. सदर कार्यालयामध्ये असंघटीत कामगार मंडळाकरीताही जागेची तरतूद असावी. सदर निविदा प्रक्रिया तातडीने हाती घेऊन आगामी ०६ महिन्यात राज्यातील ४२ ठिकाणी भाडयाच्या जागेवर साधारणत: १००० चौ.फुट एवढया क्षेत्रफळाच्या कार्यालयांची स्थापना करण्यात यावी. कार्यालयाची स्थापना जिल्हयाच्या मध्यवर्ती व वाहतूकीच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी असावी. |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने यापूर्वी शासनास सादर केलेल्या २८७ पदांच्या आकृतीबंधामध्ये व त्याअनुषंगाने आवश्यक सेवा प्रवेश नियमात बदल/ सुधारणा करून सुधारित प्रस्ताव तात्काळ शासन मान्यतेस सादर करावा.

४. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने ०२ स्वतंत्र RFP Document तयार कराव्यात त्यामध्ये खालील बाबींचा समावेश असावा.

अ) **राज्यात ४२ कार्यालयाची स्थापना करणे-**

१. कार्यालयाची जागा शक्यतो जिल्हयाच्या मध्यवर्ती ठिकाणी व वाहतूकीच्या दृष्टीने सोयीचे असावे.

२. कार्यालयाची जागा प्रथमत: ०५ वर्षासाठी रेडीरेकनरच्या दराने किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंजूर दराच्या मर्यादेत भाडेतत्वावर घेण्यात यावी. आवश्यकतेनुसार मुदतवाढीची तरतूद असावी.

३. जागेचे क्षेत्रफळ साधारणत: १ हजार चौ.फुट एवढे असावे.

४. कार्यालयात आवश्यक सुविधा फर्निचर, टेलिफोन, लाईट, इंटरनेट, पाण्याची व्यवस्था, प्रसाधनगृहे, वाहनतळे इ. सर्व सोयीयुक्त असावे.

ब) **एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करणे**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

१. संगणकीय प्रणाली विकसीत करून त्याची अंमलबजावणी

२. हार्डवेअर व नेटवर्किंग संबंधी पायाभूत सुविधा पुरविणे.

३. सद्यस्थितीतील मंडळाची माहिती नव्या संगणकीय प्रणालीवर स्थलांतरीत करावे.

४.उक्त कामाशी संबंधित तात्पुरत्या स्वरूपात मनुष्यबळ पुरविणे

| अ.क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| अ. | इ.व.इ.बां.क.मंडळ | |
| १. | सुविधा केंद्रप्रमुख | ०१ |
| २. | डेटा एंट्री ऑपरेटर | ०२ |
| ३. | सहाय्यक | ०१ |
| ४. | क्षेत्रिय कर्मचारी | ०२ |
| | **एकूण** | **०६** |
| ब | असंघटीत मंडळ | |
| १. | डेटा एंट्री ऑपरेटर | ०२ |
| | **एकूण** | **०२** |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **एकूण (अ+ब)** | ०८ |

५. एकात्मिक संगणक प्रणालीचे चलन व व्यवस्थापन (operation and maintenence) करणे.

६. सदर कामाशी संबंधित इतर अनुषंगिक कामे.

मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावाप्रमाणे मे. केपीएमजी यांनी सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी ०२ स्वतंत्र RFP डॉक्युमेंटस तयार केले आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दि.२८.०६.२०१७ रोजीच्या कामगार विभागाच्या आढावा बैठकीत सदर विषयाबाबत बोलताना मा. मुख्यमंत्री महोदय यांनी संचालक माहिती व तंत्रज्ञान यांना मंडळाच्या बैठकीत निमंत्रित करून RFP Document अंतिम करण्यात यावे, असे निर्देश दिले. त्यानुसार प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांना दि.१३.०७.२०१७, ०७.०७.२०१७, रोजीचे पत्राद्वारे कळवून संचालक माहिती व तंत्रज्ञान यांना मंडळाच्या दि.१८.०७.२०१७ बैठकीत उपस्थित राहणेबाबत निर्देश दयावेत असे कळविण्यात आले होते. तथापि, संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी त्याच दिवशी प्रस्तावित मंत्रीमंडळाच्या (Cabinate) बैठकीनंतर मा. मुख्यमंत्री महोदयांनी चर्चेस बोलावले असल्याने मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहणे शक्य होणार नाही, असे SMS द्वारे कळविल्याचे मंडळ सचिव यांनी सांगितले. याबाबत मा. मंत्री महेदय (कामगार)



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मे. केपीएमजी या मंडळाच्या सल्लागार संस्थेने तयार केलेले एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीचे RFP डॉक्युमेंटचे सादरीकरण केले.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा.संचालक माहिती व तंत्रज्ञान यांना मे. KPMG यांनी तयार केलेले दोन्ही RFP Document दिनांक ११.०७.२०१७ रोजी पाठविण्यात आले होते. सदर RFP Document बाबत मा. संचालक, महिती व तंत्रज्ञान यांनी दिनांक १७.०७.२०१७ रोजी मेलद्वारे पुढीलप्रमाणे अभिप्राय मंडळास कळविले आहेत.

The sequence of events of the matter are as follows:

i) Maharashtra Building and other Construction workers Welfare Board (MBOCWWB) had assigned the project for "Selection of Managed Service Provider (MSP) for Implementation, Operations & Maintenance of Integrated Welfare Board Management System" to Maharashtra Information Technology Corporation (MahaIT). Accordingly, MahaIT issued the RFP for the same on ०६.१२.२०१६. The technical and commercial evaluation was completed by MahaIT & the selection of the successful bidder was communicated to the Department of Labour. Neode



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | solutions, a public Sector Undertaking (PSU) of the Government of Gujrat, which i[s] a CMMi level ५ company, was the successful bidder as per the evaluation conducte[d] by MahaIT. Communication from the Department or the Board regardin[g] implementation of the project is still awaited.<br>ii) In a meeting chaired by Hon. Chief Minister on २८.०६.२०१७ regarding review o[f] the MBOCWWB, Department mentioned that they would be doing the fresh tendering process as the scope of the project was changed to include unorganized workers also along with construction workers. It was pointed out by DIT in this meeting that the inclusion of unorganized workers along with the originally envisaged construction workers would not make any difference as the registration envisaged a process of Aadhaar based registration which would be common for both streams. In addition, the financial model in the RFP floated by MahaIT was a transaction model which made it easy to accommodate any increase in the number of applicants.<br>iii) In spite of this, Board has convened a meeting to consider a fresh RFP. DIT has |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

been invited to attend this meeting. The draft RFPs (two RFPs have been prepared) have been shared with DIT by email on ११.०७.२०१७.

It is pointed out that the "Board has appointed project consultants withour following the procedure laid down in DIT GR dated ०१.०७.२०१४. After the tenure of the previous consultants E & Y ended, new project consultants, KPMG have been appointed by the Board. Scope of work was neither shared with DIT nor consent taken.

On perusal of the draft RFPs, the observations are as follows.

i) The scope of work envisaged in the RFPs is exactly the same as that of the RFP floated by MahaIT. There is no inclusion of unorganized sector workers in the scope of work of the work of the RFP. This is contrary to the stand of the Department in the meeting chaired by Hon. Chief Minister on २८.०६.२०१७. In fact, inclusion of unorganized sector workers was cited as the main reason for going in for a fresh RFP in the first place.

ii) The items of work relatinf to setting up of physical infrastructure at the Worker Facilitation Centres proposed to be set up by the Department have been included in



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

the second RFP. The first RFP includes software application development, maintenance & operation of the Worker Facilitation Centres. Further, the financial model has been changed from a hybrid model (opex + transaction cost) to a capex + opex mode with no transaction charges being proposed to be levied in the RFP.

iii) Some of the clauses in the pre-qualification and technical evaluation criteria suffer from logical inconsistencies as follows.

a) As per PQ-२, while the lead bidder is required to have a turnover of Rs. २५ crore, the consortium (if any) is expected to have a total turnover Rs. २०० crore. DIT has never come across such clauses in any earlier RFP where the total cumulative turnover of the consortium partners is specified as a pre-qualification criterion. Specifying cumulative turnover of the consortium will not serve any purpose and will defeat the purpose of the main responsibility of project execution resting on the lead bidder. It is not clear if this amount of Rs. २०० crore is average annual turnover or total turnover. In either case, we have a situation where the lead bidder will have a lower turnover than a consortium partner.



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

Para ३.२ of the draft RFP itself mentions the following.

The Lead Bidder would have the sole responsibility fo ensuring the delivery of infrastructure and services mentioned in this RFP. The Lead Bidder would also be responsible for ensuring the successful execution of integrated solution including meeting the SLAs.

Considering the estimated project value & the fact that the lead bidder would be responsible for project delivery and SLAs, the turnover requirement for lead bidder is too low. It is not clear what kind of filtering the Board aims to acheieve by putting such a PQ criteria of low turnover for lead bidder and high turnover for consortium partner.

b) In PQ-४, PQ-६ and PQ-७, the specified criteria require the lead bidder to have executed a Rs. System integration project of atleast Rs. ५० Crore, a facilities management project of Rs. २५ crore and have at least ५०० employees on its rolls. These are totally contradictory with a low turnover of Rs. २५ Crore mandated for the lead bidder in PQ-२.

c) In the original RFP floated by MahaIT, there was no upfront capex cost for the Board. The payment had two components. The first componenet was a quarterly



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

opex component to the bidder based on milestones regarding establishment and operation of the Workers Facilitation Center. The second componenet was a transaction based model depending on the actual number of transactions. In the draft RFP sent by the Board, the transaction model has been done away with & ८०% of the cost is proposed to be paid as capex & २०% as opex. This model imposes high capital cost on the Board. As per para ७.२७ of the e-governance policy of the state clearly gives preference to adoption of a transaction model, ७.२७ public private Parternership shall be encouraged in all e-Governance project in the state, and the State will adopt transaction based payments instead of outright purchases wherever possible, to reduce costs and/or development/roll-out time

d) Further the present RFP has a requirement of ६ lakh fresh registration peryear for the ५ year period. As per the para १०.३.३, a penalty is envisaged if the number of registrations is less than ५०००० per month. The penalty is proposed to be calculated as १०% of the total monthly cost payment. If we assume that the



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

selected vendor does not carry out a single registration, even then the Department would be able to apply a penalty of not more than १०%. This means that if the vendor defaults after setting up the centres and does not carry out a single registration, the vendor will be eligible for ९८% of the project bid cost. As there is neither an incentive for performance nor disincentive for non-performance, the Board will have almost no control over the implementation of the project.

Considering the above, the views of DIT are follows.

१. Board should authorize MahaIT to execute the project as per discovered rates in the earlier RFP.

२. There is no reason to cancel the earlier process and come up with a fresh RFP.

३. Proposed RFP has numerous logical inconsistencies, especially in the pre-qualification criteria. It might result in a weak and technically unsuitable lead bidder which will jeopardize the project. Further, moving to a capex model with weak penalty clauses will result in high project cost and wasteful expenditure for the Board. Already, the appointment of new consultant to repeat the work of bid preparation has resulted in



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | wasteful expenditure for the Board.<br>सदर अभिप्राय मा. सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांच्या मान्यतेने मंडळास प्राप्त झालेले आहेत. DIT च्या मुद्यांबाबत मा. मंत्री महोदयांनी मे.KPMG यांना खुलासा करण्याबाबत सुचित केले असता मे. KPMG यांनी RFP Document बाबत खुलासा सादर केला. यावर मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, DIT चे अभिप्राय विचारात घेऊन RFP Document मध्ये बदल करून त्वरीत शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात यावा. याविषयी सविस्तर चर्चेअंती मंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारीत केला.<br>**ठराव: माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिनांक १७.०७.२०१७ रोजी कळविलेल्या अभिप्रायानुसार मे. KPMG या सल्लागारांकडून एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करून राबविणेसाठीचे RFP Document मध्ये बदल करून मंडळाच्या एकात्मिक संगणकीय प्रणालीचे व राज्यातील ४० जिल्हा सुविधा केंद्र व ६ प्रादेशिक सुविधा केंद्र स्थापनेबाबतचे RFP Document त्वरीत शासन मान्यतेस सादर करण्यात यावे व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| **३.** | **ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांची नोंदणी सुलभतेने व** | याबाबत बोलताना मंडळाचे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, मंडळांतर्गत बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता सरकारी कामगार अधिकारी/ दुकाने निरिक्षक यांना नोंदणी |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **तत्परतेने होण्यासाठी ग्रामीण भागासाठी गटविकास अधिकारी व शहरी भागासाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद / वार्ड ऑफीसर, मनपा यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करणे.** | अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. कामगार आयुक्तालयांतर्गत मंजूर पदांपैकी ४९% पदे रिक्त आहेत. त्यापैकी काही जिल्हा कार्यालयांना स्वतंत्र सरकारी कामगार अधिकारी नसल्याने शेजारच्या जिल्हयातील सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सरकारी कामगार अधिकारी यांची रिक्त पदे व अतिरिक्त कार्यभार यामुळे बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे प्रस्ताव वेळीच निकाली काढणे शक्य होत नाही, परिणामी बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरणाची गती फारच कमी आहे. कामगार आयुक्तालयाचे कार्यालय जिल्हा स्तरावर असल्याने तालुका स्तरावरील बांधकाम कामगारांना नोंदणीचे अर्ज व त्यासोबतचे दस्तऐवज सादर करणे, नोंदणीकरीता प्रत्यक्ष हजर राहणे तसेच दरवर्षी पुर्ननोंदणी करणे अडचणीचे ठरत आहे.<br><br>देश पातळीवरील National Sample Survey Organization (एनएनएसओ ) या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात सन २०१५-१६ अखेर सुमारे २७.५३ लक्ष बांधकाम कामगार असून त्यापैकी मार्च २०१७ पर्यंत मंडळाकडे ५.९३ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी २.९८ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील बांधकाम कामगारांच्या नोंदणीमध्ये भरीव वाढ करण्यासाठी तसेच कल्याणकारी योजनेचे लाभ देणेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मध्यप्रदेश राज्याच्या धर्तीवर बांधकाम कामगारांची नोंदणी सहजतेने, तत्परतेन व गतीने व्हावी यासाठ ग्रामीण भागासाठी गटविकास अधिकारी व शहरी भागासाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद/ वार्ड ऑफिसर, मनप यांना इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ चे कलम १२ (२) नुसा नोंदणी अधिकारी म्हणून घोषित केल्यास तालुका स्तरावरील ग्रामीण भागातील मनरेगा योजनेंतर्गत बांधकाम कामगार, शासनाच्या विविध योजनांतर्गत कार्यरत बांधकाम कामगार व खाजगी आस्थापनांवर कार्यरत बांधकाम कामगार यांना नोंदणीकरीता जिल्हा स्तरावर जावे लागणार नाही. किंबहुना त्यांची तालुकास्तरावरून नोंदणीची कार्यवाही होऊ शकेल व बांधकाम कामगारांची नोंदणी मोठया प्रमाणात होईल. तसेच शहरी भागात बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याकरीता नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी/ मनपा क्षेत्रातील वार्ड ऑफिसर यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित केल्यास शहरी भागातील बांधकाम कामगारांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होईल.<br><br>उक्त बाबींच्या अनुषंगाने दि.२२.०६.२०१७ रोजी शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.<br><br>मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०६.२०१७ रोजी संपन्न कामगार विभागाच्या आढावा बैठकीत सदर विषयावर चर्चेअंती मंडळाच्या प्रस्तावानुसार कामगार विभागाने नगरविकास विभाग व |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ग्रामविकास विभागाच्या सहमतीने अधिसूचना निर्गमित करावी असे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिले व दि.२२.०६.२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस प्रस्तावित असल्याचे असल्याचे मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दर्शनास आणून दिले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: बांधकाम कामगारांची नोंदणी सुलभतेने व तत्परतेने होण्यासाठी ग्रामीण भागासाठी गटविकास अधिकारी व शहरी भागासाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद / वार्ड ऑफीसर, मनपा यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबतचा दिनांक २२.०६.२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ४. | **इमारत व इतर बांधकामाशी संबंधित सर्व शासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व मंडळे/ महामंडळे यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या सर्व** | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ०७ (अ) नुसार प्रत्येक आस्थापनांनी काम सुरू झाल्यापासून ६० दिवसाच्या आत मंडळाकडे नोंदणी करणे अनिवार्य आहे.सन २०१५-१६ च्या आर्थिक पाहणी अहवालात नमूद केल्याप्रमाणे राज्यातील अंदाजे १.०२ लक्ष बांधकाम आस्थापना कार्यरत आहेत. त्यापैकी ७७६१ (केवळ ७.६%) बांधकाम आस्थापनांची नोंदणी मंडळाकडे झालेली आहे. राज्यातील सर्व आस्थापनांची नोंदणी झाल्यास बांधकाम कामगारांची नोंदणी व मोठया प्रमाणावर उपकर जमा होण्यास मदत होईल. |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **बांधकाम आस्थापनांची तसेच त्यावरील सर्व कामगारांची नोंदणी मंडळाकडे अनिवार्य करणे तसेच, अशा बांधकामावरील १% उपकर मंडळाकडे जमा करणे अनिवार्य करणेबाबत.** | इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १२ अन्वये ज्या बांधकाम कामगाराने मागील ०१ वर्षात ९० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केले आहे, अशा १८ ते ६० वर्षे वयोदरम्यानचे कामगार मंडळाकडे नोंदणीस पात्र ठरतात.<br><br>"इमारत किंवा इतर बांधकाम काम" ची व्याख्या अधिनियमाच्या कलम २ (D) मध्ये दिलेली आहे. त्यामध्ये बांधकाम, फेरफार, दुरूस्ती, देखभाल, किंवा पाडून टाकणे इत्यादी इमारत, रस्ते, मार्ग, रेल्वे, ट्रॉमवेज, एअर फिल्डस, पाठबंधारे, जलनिस्सारण, बंधारा व नेव्हीगेशन काम, पूर नियंत्रणाचे काम (वादळामुळे जलनिस्सारणाच्या कामासहीत), तेल व वायूची जोडणी टाकणे, विद्युत लाईन्स, वायरलेस, रेडीओ, टेलिव्हीजन, टेलिफोन, टेलिग्राफ आणि समुद्रापार दळणवळ, धरणे, कालवे,जलाशये, जलप्रवाह, बोगदे, पूल , सेतू, सेतूप्रणाल,पाईपलाईन, टॉवर्स, कुलींग टॉवरर्स, पारेषण टॉवर्स इ. चा समावेश आहे.<br><br>नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन (NSSO) या देशपातळीवरील संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र राज्यातील सन २०१५-१६ या वर्षापर्यंत बांधकाम कामगारांची संख्या २७.५३ लक्ष एवढी आहे. तथापि, माहे जून २०१७ पर्यंत मंडळाकडे केवळ ६.१० लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे.<br><br>इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ०३ नुसार बांधकामावरील खर्चाच्या ०१% पेक्षा कमी नाही एवढा (जमिनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन परिपत्रक दि.२१.०४.२००८ अन्वये दि. ०१ जानेवारी २००८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्त्यांकडून उपकर वसुल करणेबाबत निर्देश दिले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन परिपत्रक दि.२६ ऑक्टोबर २००९ अन्वये उपकर वसुलीची पध्दत निश्चित करण्यात आलेली आहे. सर्व आराखडा मंजूर करणारे प्राधिकरणांनी बांधकामाचे आराखडे मंजूर करताना बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% एवढा उपकर वसूल करून तसेच शासकीय निमशासकीय विभागामार्फत करण्यात येत असलेल्या इमारत व इतर बांधकामावरील खर्चाच्या देयकातून १% उपकर वसूल करून मंडळाच्या खात्यात जमा करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.<br>नॅशनल कॅम्पेन कमिटी फॉर सेंट्रल लेजिसलेशन ऑन कन्स्ट्रक्शन लेबर या समितीचा राज्यनिहाय जमा उपकराचा अहवाल केंद्र शासन स्तरावरील नॅशनल लिगल सर्व्हिसेस ऑथरिटी (NALSA) या संस्थेने दि.२३.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्याच्या इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाकडे रू.१५,००० कोटी एवढा उपकर जमा होणे अपेक्षित आहे . तथापि माहे मे २०१७ पर्यंत मंडळाकडे रू.५८२१ कोटी एवढा उपकर जमा झालेला आहे. सबब, उर्वरित उपकर जमा करण्याबाबत निश्चित उपाययोजना करणे आवश्यक आहे.<br>मा. सर्वोच्च न्यायालयात नॅशनल कॅम्पेन कमिटी फॉर सेंट्रल लेजिसलेशन ऑन कन्स्ट्रक्शन लेबर यांनी |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ व इमारत व इतर बांधका कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या तरतूदींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दाखल केलेल्य रिट याचिका क्र.३१८/२००६ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय राज्यनिहाय जमा उपकर, कल्याणकारी योजनांवरील खर्च व बांधकाम कामगारांची नोंदणी यावर लक्ष ठेवून आहे. तसेच, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात बांधकाम आस्थापनांची नोंदणी, कागारांची नोंदणी तसेच उपकर वसूलीचे कामकाज समाधानकारक नसल्याचे मत नोंदवून बांधकाम कामगारांची कमी नोंदणी व कल्याणकारी योजनांवरील कमी खर्च याबाबत कायद्यातील तरतूदीनुसार त्वरेने पाऊले उचलण्याचे दि.१५.०३.२०११, दि.२५.०४.२०११ व दि.१६.१०.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनामार्फत निर्देश दिले आहेत.<br><br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम कामागरांची नोंदणी तसेच त्यांच्या कल्याणकारी योजनांवरील खर्च याबाबत संसदेच्या स्थायी समिती (कामगार) यांचे मार्फत कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांची दि.२३.०५.२०१७ रोजी साक्ष घेण्यात आली आहे. सदर साक्षी दरम्यान उक्त समितीने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत असलेली कमी कामगार नोंदणी व त्यांच्या कल्याणकारी योजनांवरील कमी उपकर खर्चाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून कामगारांची |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | नोंदणी वाढविणे व जास्तीत जास्त जमा उपकर निधी बांधकाम कामागारांच्या कल्याणासाठी खर्च करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबाबतचा अहवाल दि.२४.०५.२०१७ रोजी राज्य शासनास सादर करण्यात आल असल्याचे मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणून दिले.<br>याबाबत बोलताना मंडळ सचिव पूढे असेही म्हणाले की, मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दि.२३.०६.२०१६ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्रातील कामगारांची नोंदणी संख्या वाढविण्यासाठी व त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, म्हाडा (गृहनिर्माण विभाग), सिडको (नगर विकास विभाग), एमआयडीसी (उद्योग विभाग) तसेच बांधकाम क्षेत्राशी संबंधित इतर सर्व शासकिय, निमशासकिय विभागांनी सक्रिय सहभाग घेऊन त्यांच्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत बांधकाम आस्थापनांची नोंदणी करण्यासाठी व बांधकाम कामगारास आवश्यक प्रमाणपत्र देण्यासाठी, संबंधित नियोक्त्यास निदेश देण्याबाबत सर्व संबंधित विभागांनी आदेश निर्गमित करावे असे निर्देश दिले होते. तथापि, संबंधित विभागाकडुन अद्यापही असे आदेश निर्गमित झालेले नाही. दि.२८.०६.२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत बांधकामाशी संबंधित विभागानी अद्याप वरील प्रमाणे आदेश निर्गमित न केल्याने असामाधान व्यक्त केले असून इमारत व इतर बांधकामाशी संबंधित सर्व शासकीय विभागांनी येत्या १५ दिवसात आदेश निर्गमित |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | करण्याचे मा. मुख्यमंत्री महोदय यांनी निदेश दिलेले आहेत.<br>इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील तरतूद, केंद्र शासनाचे निर्देश, मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.२३.०६.२०१६ व दि.२८.०६.२०१७ रोजी दिलेले आदेश विचारात घेता राज्यातील इमारत व इतर बांधकामाशी संबंधित सर्व शासकीय विभागे, मंडळे, महामंडळे यांच्यामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत संबंधित प्रशासकीय विभागाकडून आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे. सर्व बांधकाम आस्थापनांची नोंदणी कामगार मंडळाकडे बांधकाम सुरू झाल्यापासून ६० दिवसाच्या आत करणे अनिवार्य असल्याचे मंडळ सचिवांनी सांगितले.<br>बांधकामावर कार्यरत असलेले सर्व बांधकाम कामगारांची मंडळात नोंदणी करण्यासाठी काम केलेल्या दिवसाच्या प्रमाणपत्रासह नोंदणीचा सविस्तर प्रस्ताव मंडळाकडे पाठविण्यात यावा. खाजगी मालक/ विकासकांच्या बाबतीत इमारत व इतर बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% उपकर (भूसंपादनाचा खर्च वगळून) एक रक्कमी वसूल करावा तसेच शासकीय कंत्राटदाराच्या देयकातून १% रक्कम वसूल करून मंडळाच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावी. तसेच, आस्थापनांची नोंदणी, कामगारांच्या नोंदणीचे प्रस्ताव, उपकर वसूलीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दरमहा मंडळाकडे पाठविण्यात येणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

शासनाच्या इमारत व इतर बांधकामाशी संबंधित विभागाकडून त्याच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका, जिल्हा परिषद, मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्थांकरीता आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

बांधकाम आस्थापनांच्या नोंदणी ऑनलाईन पध्दतीने maharashtra.gov.in या संकेतस्थळावर केली जाते. बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता शासन स्तरावरून राज्यातील इमारत व इतर बांधकामाशी संबंधित सर्व शासकीय विभागांना विनंती करून, त्याच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये, मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्था यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार बांधकाम आस्थापनांची नोंदणी, बांधकाम कामगारांची नोंदणी व बांधकामावरील उपकर वसूलीबाबत वरील प्रमाणे कार्यवाहीचे आदेश निर्गमित करणेबाबत शासन मान्यतेस्तव दि.१५.०७.२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, असे मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणून दिले.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना नोंदणी वाढविण्यासाठी व बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी मंडळाने अर्जाचा नमुना तयार करावा. त्याचप्रमाणे बांधकाम कामगारांसाठी कोणी ऐच्छिक (Voluntary) काम करण्यास तयार असेल तर त्यांच्याकडून कामगारांचे अर्ज घेऊन त्यांची नोंदणी करून त्यांना लाभ देण्यात यावा. त्याचप्रमाणे नोंदणीसाठी वेगवेगळे कॅम्प प्रत्येक



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

//

| | | |
|---|---|---|
| | | जिल्हयात ऑगस्ट महिन्यापासुन आयोजित करावे व कॅम्पचा खर्च मंडळाकडून करण्यात यावा असे निदेश मा मंत्री महोदय (कामगार) यांनी दिले.<br>त्यावर मा. सहसचिव श्री विधळे यांनी कॅम्प साठी ठराविक रक्कमेची तरतूद करण्यात यावी, असे सुचविले. याबाबत बोलताना मा. मंत्री (कामगार) यांनी प्रति कॅम्प रु. १०,०००/- एवढी रक्कम निश्चित करण्यात यावी असे निदेश दिले.<br>श्री. कुटास्कर यांनी मंडळाचे संकेत स्थळ चालु झाल्यानंतर नोदंणी अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावा, असे सुचविले.<br>यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी नोंदणीसाठी ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची अट शिथील करत नाही तोपर्यंत नोंदणीत वाढ होणार नाही, असे मत व्यक्त केले. त्यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे निर्दशनास आणून दिले की, कायद्यातील तरतुदीनुसार बांधकाम कामगारांने मागील वर्षभरात ९० दिवस काम केल्याचे मालकाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. कामगारांना सदर प्रमाणपत्र मिळण्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने दिनांक १३.०८.२०१४ अन्वये ज्या बांधकाम कामगारांचे मालक सतत बदलनारे आहेत अशा बांधकाम कामगारांना ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी, महानगरपालिकेचे प्राधिकृत अधिकारी यांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

आहेत. सदर बाब कायदेशीर असून केंद्राने सदर कायद्यात बदल केल्याशिवाय ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची अट शिथिल करता येणार नाही, असे नमूद केले.

त्यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचविले की, जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी होण्यासाठी उक्त नियमांमध्ये सुधारणा करणेसाठी तसेच बांधकाम कामगारांची ते बांधकाम कामगार असल्याचे, त्यांनी मागील वर्षभरात कमीत कमी ९० दिवस काम केल्याचे, कामाचा कालावधी, संबंधित मालकाचा व बांधकामाच्या ठिकाणाचा (Construction Site) इत्यादी तपशिल नमुद केलल्या शपथपत्राच्या आधारे (Self Certification) नोंदणी करण्यासाठी मंडळाने ठराव घेऊन मान्यतेस्तव शासनास पाठवावा.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: १. इमारत व इतर बांधकामाशी संबंधित सर्व शासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व मंडळे/ महामंडळे यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या सर्व बांधकाम आस्थापनांची तसेच त्यावरील सर्व कामगारांची नोंदणी मंडळाकडे अनिवार्य करणे तसेच अशा बांधकामावरील १% उपकर मंडळाकडे जमा करणे अनिवार्य करणेबाबत शासनास दिनांक १५.०७.२०१७ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**२. बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी माहे ऑगस्ट २०१७ पासून दरमहा जिल्हयातील एका**



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | तालुक्यात नोंदणीचे कॅम्प आयोजित करण्यात यावेत. कॅम्पसाठी तालुका स्तरावील लोकप्रतिनिधी, कामगा संघटना प्रतिनिधी व बांधकाम कामगारांशी संबंधितांना निमंत्रित करावे. सदर कॅम्प आयोजनाचा खर्च रु १०,०००/- च्या मर्यादेत मंडळामार्फत करण्यात यावा. बांधकाम कामगारांना नोंदणीचे अर्ज नोंदणी कार्यालय व कॅम्पमध्ये सहज उपलब्ध होतील याची व्यवस्था करावी तसेच, मंडळाच्या प्रस्तावित संकेतस्थळावरही नोंदणी अर्जाचा नमुना उपलब्ध करून द्यावा.<br>३. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ चे कलम १२ (१) नुसार बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतणीकरणाकरीता मागील वर्षी कमीत कमी ९० दिवस काम केले असणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ च्या नियम ३३(३)(c) मधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांने मागील वर्षभरात ९० दिवस काम केल्याचे मालकाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, नियमातील सदर तरतूदीमध्ये बदल करून बांधकाम कामगारांचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certification) घेऊन नोंदणी करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात यावा.<br>वरिलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आले. |
| ५. | सर्व बांधकाम कामगारांची नोंदणी, लाभाचे वाटप व | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. इमारत २०१३/प्र.क्र.२६/काम-७ अ दि.२५.०२.२०१३ निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | **उपकराची वसूली परिणामकारक होण्यासाठी जिल्हा स्तरावर नोंदणी, लाभाचे वाटप व उपकर वसुलीचा नियमित आढावा घेवुन अंमलबजावणीमधील अडीअडचणी दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समन्वय समिती पुर्नगठीत करणेबाबत.** | ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामांचा अंतर्भाव (वृक्ष लागवड व रोपवाटिका) ही कामे वगळून इमारत व इतर बांधकामाच्या व्याख्येत नमूद केलेल्या कामामध्ये होत असल्यामुळे सदर कामावर काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळाकडून त्यांना मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देता यावा यासाठी सदर योजनेतील कामगार हे बहुतांश ग्रामीण भागातील असल्याने त्यांची नोंदणी व कामाचे नियंत्रण जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत होत असल्याने सदर कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. तथापि, सदर समितीमार्फत मनरेगा व्यतिरिक्त बांधकाम कामगारांची नोंदणीबाबत आढावा घेतला जात नाही, त्यामुळे ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांची नोंदणी झाली नसल्याचे दिसून येते.<br><br>देश पातळीवरील National Sample Survey Office (NSSO) एनएसएसओ या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात सन २०१५-१६ अखरे सुमारे २७.५३ लक्ष बांधकाम कामगार असून त्यापैकी जून २०१७ पर्यंत मंडळाकडे केवळ ६.१० लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे.त्यापैकी २.९८ लक्ष कामगार जिवीत आहेत. बांधकाम कामगाराच्या नोंदणीत व नुतनीकरणात वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. मंडळाकडे स्वतंत्र अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली नाही. तसेच, कामगार आयुक्तलयांतर्गत जवळपास ४९% पदे रिक्त असल्याने बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभ वाटपावर विपरीत परिणाम होत |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

आहे.

गटविकास अधिकारी पंचायत समिती व मुख्याधिकारी नगरपरिषद/ वॉर्ड ऑफिसर मनपा यांना इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६चे कलम १२ (२) अन्वये नोंदणी अधिकार म्हणून घोषित करणेसाठी स्वतंत्र प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

जिल्हयातील सर्व बांधकाम आस्थापनांची नोंदणी, बांधकाम कामगारांची नोंदणी व बांधकाम कामगारांना लाभाचे परिणामकारक वाटप व १% उपकर मंडळाच्या खाती जमा करणे याबाबत नियमित आढावा घेऊन अंमलबजावणी मधील अडी-अडचणी दूर करण्यासाठी मनरेगा योजनेकरीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हास्तरावर गठीत समितीमध्ये अंशत: बदल करून खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती पुर्नगठीत करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे, असे मंडळ सचिव यांनी सांगितले.

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सह-अध्यक्ष |
| ३. निवासी उपजिल्हाधिकारी नगरपरिषद (समन्वयनासाठी) | सदस्य |
| ४. उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत). | |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | | |
|---|---|---|---|
| | | जिल्हा परिषद | सदस्य |
| | | ६. उपायुक्त (वॉर्ड ऑफिस) मनपा | सदस्य |
| | | ७. जिल्हयातील मनरेगा व अन्य बांधकामाशी संबंधित | सदस्य |
| | | ८. केंद्र व राज्य यंत्रणेचे जिल्हयातील प्रमुख | सदस्य |
| | | ९. सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी | सदस्य-सचिव |
| | | सदर समितीची बैठक दर दोन महिन्यांनी आयोजित करून खालील बाबींवर आढावा घेण्याबाबत प्रस्तावति आहे.<br>१. जिल्हयातील सर्व बांधकाम आस्थापनांची नोंदणी करणे<br>२. सर्व बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतणीकरण करणे<br>३. बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनेच्या लाभवाटपातील अडीअडचणी व करावयाची उपाययोजना<br>४. बांधकामाचा १% उपकर मंडळाच्या खाती जमा केला असल्याची खात्री करणे.<br>उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन आदेश दि.२५.०२.२०१३ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मनरेगा योजनेसाठी गठीत समितीचे पुनर्गठण करून समितीस उपरोक्त कामकाज सोपविणेबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मंडळाची मान्यता मिळणे प्रस्तावित आहे. | |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत श्री कुटास्कर यांनी सदर समिती गठीत करताना संघटनेच्या प्रतिनिधींचा समावेश करावा असे सुचविले. मा. मंत्री महादेय (कामगार) यांनी समिती गठीत करताना संबंधित जिल्हयातील मा. पालक मंत्री यांच्या सहमतीने एका आमदाराची निवड करून समितीमध्ये समावेश करण्यात यावा तसेच, संबंधित विभागातील मंडळ सदस्यांचाही समितीमध्ये समावेश करण्यात यावा, असे सुचविले. उपरोक्त विषयाबाबत बोलताना मा. सहसचिव श्री. विधळे यांनी उपायुक्त (वॉर्ड ऑफिस) ऐवजी आयुक्त घ्यावे असे सुचविले.<br>त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: सर्व बांधकाम कामगारांची नोंदणी, लाभाचे वाटप व उपकराची वसूली परिणामकारक होण्यासाठी जिल्हा स्तरावर नोंदणी, लाभाचे वाटप व उपकर वसुलीचा नियमित आढावा घेवुन अंमलबजावणीमधील अडीअडचणी दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समन्वय समिती पुर्नगठीत करण्यासाठी दिनांक २३.०६.२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावात संबंधित जिल्हयाचे मा. पालक मंत्री यांच्या मान्यतेने निवड केलेल्या एका आमदाराचा समावेश करावा तसेच, समितीमध्ये खालीलप्रमाणे मंडळ सदस्यांचा जिल्हानिहाय समावेश करावा.** |

| अ.क्र. | मंडळ सदस्याचे नाव | विभागाचे नाव | जिल्हे |
|---|---|---|---|



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सतीश मगर | नाशिक | नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदूरबार (५) |
| २. | श्रीमती वेदा आगटे | पुणे | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर (५) |
| ३. | श्री. अशोक भुताड | विदर्भ | नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा (११) |
| ४. | श्री. श्रीपाद कुटास्कर | औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड बीड लातूर व उस्मानाबाद (८) |
| ५. | श्री. विजय देवरुखकर | मुंबई | मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग (७) |

**वरिलप्रमाणे जिल्हा समन्वय समिती पुर्नगठीत करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबतचा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | | |
|---|---|---|
| ६. | **मनरेगा योजनेअंतर्गत गावपातळीवर** | याबाबत मंडळ सचिव असे म्हणाले की, महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. इमारत २०१३/प्र.क्र.२६/काम-७ अ दि.२५.०२.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामांचा अंतर्भाव (वृक्ष लागवड व रोपावाटिका) ही |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **कार्यरत असलेल्या ग्रामरोजगार सेवक यांच्या मदतीने मनरेगा योजनेतील तसेच ग्रामिण भागातील इतर सर्व पात्र लाभार्थ्यांची नोंदणी व नुतनीकरण करणेकरीता ग्रामरोजगार सेवकास प्रती नोंदणी व प्रती नुतनीकरणासाठी रु. १०/- एवढा प्रोत्साहनपर मोबदला देणे, गटविकास अधिकारी** | कामे वगळून इमारत व इतर बांधकामाच्या व्याख्येत नमूद केलेल्या कामामध्ये होत असल्यामुळे सदर कामाव काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळाकडून त्यांना मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या विविध कल्याणका योजनांचा लाभ देता यावा यासाठी सदर योजनेतील कामगार हे बहुतांश ग्रामीण भागातील असल्याने त्यांच नोंदणी व कामाचे नियंत्रण जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्य मार्फत होत असल्याने सदर कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्यात आलं होती. सदर समितीने खालील मुद्यावर कार्यवाही करणे अपेक्षित होते.<br>समितीने तात्काळ बैठक घेवून या योजनेतील ज्या कामगारांनी ९० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस मागील वर्षात (नोंदणीच्या दिवसाच्या अगोदरचे १२ महिन्यात) काम केले असेल, म्हणजेच ज्यांची हजेरी रोजगार हमीच्या कामावर ९० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस असेल (वृक्ष लागवड व रोपवाटिका या कामावर केलेल्या कामाचे दिवस वगळून), अशा कामगारांचे तपशीलवार अर्ज जिल्हयातील संबंधित सहाय्यक कामागर आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे नोंदणीसाठी देण्याचे आवाहन करणे.<br>समितीने या योजनेंतर्गत शासनाच्या वेगवेगळया विभागामार्फत सुरू असलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामावरील नोंदणी सदर मंडळात करणेसंबंधी समन्वय साधणे. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| यांच्या एका सहाय्यकास मूळ वेतनाच्या १०% इतका अतिरिक्त मोबदला देणे, प्रशासकीय खर्चाकरीता गट विकास अधिकारी यांना दरमहा रु.२०००/-, लोखंडी कपाट खरेदीसाठी प्रत्येक पंचायत समितीस रू.८०००/- देणे प्रस्तावित आहे, त्यास मान्यता मिळणेबाबत. | सदर समितीने दरमहा बैठक आयोजित करून या कामागरांची नोंदणी व त्यांना देण्यात येत असलेले लाभ यावियषी आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.<br><br>सदर योजनेत काम करणाऱ्या कामागरांची मंडळाकडे नोंदणी करून त्यांना कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याबाबतची कार्यपध्दती सर्वसाधारणपणे निश्चित करण्यात आली होती. तथापि, मागील ०४ वर्षात केवळ ११,५०० बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात झालेली आहे. मनरेगा योजनेंतर्गत प्रत्यक्ष कार्यरत बांधकाम व इतर कामगारांच्या तुलनेत सदर नोंदणी अत्यल्प आहे.<br><br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या MIS Data मधील वर्षनिहाय आकडेवारीचे अवलोकन केले असता सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.<br><br>१. एकूण मनुष्यबळ- ७०९.१७ लक्ष<br>२. प्रति कुटूंब सरासरी दिवस- ४९.४६ दिवस<br>३. १०० दिवसापेक्षा जास्त दिवस काम केलेल्या कुटूंब संख्या- १,६७,८६१<br>४. एकूण कार्यरत कुटूंब- १४.३४ लक्ष |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ५. एकूण काम केलेले कामगार- २७.२७ लक्ष<br>मनरेगा अंतर्गत इमारत बांधकाम व इतर बांधकामाशी संबंधित कामगारांची जास्तीत जास्त नोंदणी होऊन बांधकाम कामगारांना मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा या उद्देशाने खालीलप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला आहे.<br>१. मनरेगा योजनेंतर्गत पंचायत समिती क्षेत्रात झालेल्या कामावरील बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे अधिकार गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना देणेबाबत शासनस्तरावरून निर्णय व्हावा व इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १२ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करावी.<br>२. मनरेगा योजनेंतर्गत काम केलेल्या बांधकाम व इतर कामगारांच्या कामाचा तपशील, काम केलेले दिवस इ.बाबतची माहिती मनरेगाच्या MIS Data मध्ये उपलब्ध आहे. त्याआधारे कामगारांची नोंदणी करण्यात यावी.<br>३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना नोंदणीच्या कामास सहाय्य करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्यास त्यांच्या वेतनाच्या १० % एवढा मोबदला संबंधित गटविकास अधिकारी यांच्या मागणीप्रमाणे मंडळामार्फत अदा करण्यात यावी. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ४. बांधकाम कामागरांच्या नोंदणीकरीता आवश्यक स्टेशनरी व इतर बाबींकरीता प्रती माह रू.१०००/- व नोंदणीचे दस्तऐवज ठेवण्यासाठी एक लोखंडी कपाट मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात यावे.<br>५. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष मनरेगा, इमारत व इतर बांधकाम कामगार गोंदीया यांनी त्यांच्या दि.१२.०४.२०१३ रोजीच्या पत्रान्वये असा प्रस्ताव सादर केला आहे की, मनरेगा योजनेचे कामे तालुक्यातील सर्व गावात विखुरलेली आहेत, सदर कामगारांची हजेरी घेणे, हजेरीपट पंचायत समितीकडे पाठविणे, बँकेद्वारे पगार वाटप करणे या कामाशी संबंधित ग्रामरोजगार सेवकाची मदत मनरेगा बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता व वार्षिक नुतनीकरणाकरीता घेण्यात यावी. सदर कामासाठी ग्रामरोजगार सेवकास प्रति नोंदणी/ प्रती नुतनीकरण रू.१०/ एवढा मोबदला देण्यात यावा. सदर प्रस्ताव मनरेगा बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतणीकरणासाठी अत्यंत उपयुक्त असल्याने त्यास सहमत होऊन ग्रामरोजगार सेवकास द्यावयाच्या मोबदल्याच्या खर्चाचा प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी मंडळास दरमहा सादर करावा. त्यानुसार मंडळाने गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना निधी उपलब्ध करून द्यावा.<br>६. गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी त्यांचे स्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरणाबाबतचा तपशील दरमहा जिल्हाधिकारी, जिल्हा कामगार अधिकारी व मंडळाच्या |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मुख्यालयास सादर करावा.<br>७. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर कार्यवाहीचा दरमहा आढावा घ्यावा.<br>मनरेगा योजनेंतर्गत कार्यरत बांधकाम कामगारांची जास्तीत जास्त नोंदणी होण्याच्या दृष्टीने शासनास दि.२२.०६.२०१७ रोजी सादर उपरोक्त प्रस्तावात गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना प्रशासकीय खर्चाकरीता दरमहा रू.१०००/- ऐवजी दरमहा रू.२०००/- मंडळामार्फत अदा करणे असा बदल करून शासनास सादर करावयाचा सुधारित प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस प्रस्तावित आहे.<br>याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, मनरेगा कामगारांच्या मंडळाकडे ज्या याद्या आहेत त्या कामगारांच्या नोंदणीस मान्यता देणे व नोंदणी करण्यासाठी सर्व जिल्हा कार्यालयांना पत्राद्वारे कळविण्यात यावे.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मनरेगा योजनेअंतर्गत गावपातळीवर कार्यरत असलेल्या ग्रामरोजगार सेवक यांच्या मदतीने मनरेगा योजनेतील तसेच ग्रामिण भागातील इतर सर्व पात्र लाभार्थ्यांची नोंदणी व नुतनीकरण करणेकरीता शासनाच्या दिनांक २२.०६.२०१७ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना प्रशासकीय खर्चाकारीता दरमहा रु.** |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**